आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२७ जुलै २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्र्यांनी मन की बात मधे विशद केलं वैज्ञानिक प्रगतीपासून लोकपरंपरांपर्यंत विविध क्षेत्रांचं महत्त्व / खेलो भारत निती २०२५ अंतर्गत खेळांशी संबंधित स्टार्टअप्सना सर्व प्रकारची मदत करण्याचं दिलं आश्वासन

- प्रधानमंत्र्यांचा आज तमिळनाडूत आदि तिरुवतीराई महोत्सवात सहभाग

- फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख या तुल्यबळ खेळाडूंमधे विजेतेपदासाठी आज पुढची फेरी

**आणि**

- उत्तराखंडमधे हरिद्वारच्या मनसादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू

**<><><><>**

अंतराळ क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळे लहान मुलांमध्ये विज्ञान विषयक जिज्ञासा वाढली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२४ वा भाग होता. अलिकडेच ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांची अंतराळवारी यशस्वी झाली, त्याचा देशात आनंदोत्सव झाला याचा उल्लेख त्यांनी केला. यानिमित्तानं त्यांनी ऑगस्ट २०२३ मधल्या चांद्रयान ३ मोहिमेच्या यशाची आठवण करून दिली. या सफलतेनंतर लहान मुलांमध्ये इन्स्पायर-मानक या उपक्रमात सहभागी होणाऱ्या मुलांची संख्या दुप्पटीनं वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात अंतराळ विषयक स्टार्ट-अप्सबद्दल ते म्हणाले.

**- - -होल्ड - प्रधानमंत्री-बाईट - -**

येत्या २३ ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनासाठी आपल्या कल्पना, नमो ॲप वर पाठवण्याचं आवाहनही त्यांनी श्रोत्यांना केलं.

भारतीय विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र तसंच गणित ऑलिंपियाड मध्ये केलेल्या पदक विजेत्या कामगिरी बद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. पुढच्या महिन्यात

खगोलशास्त्र तसंच खगोलभौतिकशास्त्र ऑलिंपियाड मुंबईत होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

मराठा साम्राज्याच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोची मान्यता मिळाल्याचं त्यांनी अभिमानाने सांगितलं. या प्रत्येक किल्ल्याचं ऐतिहासिक महत्त्व आणि वैशिष्ट्य, यातून छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी दिसते असं ते म्हणाले.

ऑगस्ट महिन्यातल्या स्वातंत्र्य लढ्याशी संबंधित महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख त्यांनी केला. खुदीराम बोस यांच्या बलिदानाची आठवण त्यांनी करून दिली. १ ऑगस्टला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी, ८ ऑगस्टला गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेलं भारत छोडो आंदोलन, ७ ऑगस्ट १९०५ ला सुरू झालेली स्वदेशी चळवळ आणि १५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन यांचा उल्लेख त्यांनी केला. देशाच्या फाळणीच्या वेदनांचं स्मरण करून देण्यासाठी १४ ऑगस्ट रोजी फाळणी वेदना स्मृती दिन पाळला जात असल्याचंही त्यांनी श्रोत्यांना सांगितलं.

येत्या ७ ऑगस्टला साजऱ्या होत आलेल्या राष्ट्रीय हातमाग दिनाला यंदा १० वर्ष पूर्ण होत असल्याची आठवणही त्यांनी श्रोत्यांना करून दिली. यानिमित्तानं त्यांनी महाराष्ट्रातल्या पैठण इथल्या कविता ढवळे यांनी सरकारनं केलेल्या सहाय्याच्या बळावर आपला व्यवसाय आणि उत्पन्न कसं वाढवलं याचं उदाहरण श्रोत्यांसमोर मांडलं. याबद्दल कविता ढवळे यांनी आनंद व्यक्त केला. ....

**- - होल्ड- बाईट- कविता ढवळे - -**

अशाच इतर यशोगाथाही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना सांगितल्या. वस्त्रोद्योग आणि तयार कपड्यांची बाजारपेठ सातत्यानं वाढत असून, वस्त्रोद्योग हे विकसित आणि आत्मनिर्भर भारताचा सर्वात मोठा आधार आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. सध्या देशभरात तीन हजारापेक्षा जास्त वस्त्रोद्योग स्टार्ट-अप्स सक्रिय असल्याची माहिती त्यांनी दिली.

भजन - कीर्तनातून होणाऱ्या जनजागृतीबद्दलही त्यांनी श्रोत्यांना सांगितलं. आपल्या लोकपरंपरा केवळ इतिहास नव्हे तर समाजाला दिशा देण्याचं साधन आहे, असं त्यांनी सांगितलं.

वर्तमान आणि इतिहासाच्या दस्तऐवजीकरणाचं महत्त्वही सांगत प्रधानमंत्री म्हणाले, हस्तलिखितांच्या स्वरूपात शतकानुशतके जतन केलेलं ज्ञान ही आपली खरी ताकद आहे,

त्यात विज्ञान आहे, वैद्यकीय उपचार पद्धती संगीत, तत्त्वज्ञान आणि मानवतेचे भविष्य उज्ज्वल बनवू शकणाऱ्या विचारांचा ठेवा आहे.

या असाधारण ज्ञानाचा वारसा जपणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी असल्याचं ते म्हणाले, यादृष्टीनं देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली. जैवविविधतेची ओळख होण्यासाठी पक्षी निरीक्षणासारख्या छंदाना प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

माओवादी हिंसाचार संपुष्टात आणून त्यात गुंतलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्नही त्यांनी मांडले.

जागतिक पोलिस आणि अग्निशमन स्पर्धेत भारतानं मिळवलेल्या घवघवीत यशाचा उल्लेख करून त्यांनी या सर्व खेळाडूंचं आणि प्रशिक्षक संघाचं अभिनंदन केलं. आता २०२९ मध्ये या स्पर्धा भारतात होणार असल्याची माहिती त्यांनी श्रोत्यांना दिली.

खेलो भारत निती २०२५ अंतर्गत खेळांशी संबंधित स्टार्टअप्सना सर्व प्रकारची मदत केली जाईल, असं ते म्हणाले. खेळ सांघिक भावना निर्माण करतात. खेळ हा तंदुरुस्ती, आत्मविश्वास आणि एक मजबूत भारत निर्माण करण्याचा मार्ग आहे, म्हणून भरपूर खेळा, असं आवाहन त्यांनी केलं.

स्वच्छ भारत मोहिमेला लवकरच ११ वर्षे पूर्ण होणार असल्याची आठवण त्यांनी करून दिली. दरवर्षी होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणामुळे या भावनेला आणखी पाठबळ मिळालं असल्याचं त्यांनी नमूद केलं. स्वच्छता हे एका दिवसाचं काम नाही, आपण वर्षातील प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी स्वच्छतेला प्राधान्य देऊ, तेव्हाच देश स्वच्छ राहील असा सल्लाही त्यानी श्रोत्यांना दिला.

हरियाली तीज, नागपंचमी, रक्षाबंधन, आणि जन्माष्टमी या सणांच्या शुभेच्छाही त्यांनी जनतेला दिल्या.

**<><><><>**

माजी राष्ट्रपती डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या स्मृतीदिनानिमित्त देश आज त्यांना अभिवादन करीत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉ कलाम यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. डॉ कलामांचे विचार नवीन पिढीला राष्ट्रनिर्माणाची प्रेरणा देत राहतील असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सीआरपीएफ, अर्थात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त सीआरपीएफचे जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या सुरक्षा यंत्रणेत, विशेषतः अंतर्गत सुरक्षेशी संबंधित आव्हानात्मक प्रसंगी, सीआरपीएफ ने महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज तामिळनाडूमध्ये गंगाईकोंडा चोलापुरम मंदिरात चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या जयंती उत्सवात सहभागी होत आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाने आदि तिरुवतीराई महोत्सवाच्या माध्यमातून चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेला हा महोत्सव आज संपन्न होत आहे. गंगाईकोंडा चोलापुरम ही जवळजवळ अडीचशे वर्ष चोल साम्राज्याची राजधानी होती. आदि तिरुवतीराई महोत्सव २०२५, राजेंद्र चोल प्रथम यांचा चिरस्थायी वारसा आणि चोल राजवंशाच्या तेजस्वी संस्कृतीला मानवंदना देतो.

प्रधानमंत्री मोदी काल मालदीव दौरा आटोपून तमिळनाडूत तुतिकोरीन इथं पोहोचले. तिथं त्यांनी तुतीकोरिन विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन केलं. तसंच ४ हजार ८०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि उद्घाटन देखील केलं.

**<><><><>**

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख या तुल्यबळ खेळाडूंमधे विजेतेपदासाठीची लढत सुरु आहे. पहिला गेम काल बरोबरीत राहिल्यानं दोघींनाही प्रत्येकी अर्धा गुण देण्यात आला आहे. दुसरा निर्णायक गेम आज होणार आहे.

**<><><><>**

राइन-रुहर इथं सुरू असलेल्या जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत भारतीय धावपटू सीमा ने ५ हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेत अंतिम फेरीत रौप्य पदक पटकावलं आहे. या स्पर्धेत पदक जिंकणारी पहिली महिला, म्हणून तिनं इतिहास रचला आहे. या स्पर्धेत भारतानं आतापर्यंत ९ पदकं जिंकली आहेत.

**<><><><>**

उत्तराखंडमधे हरिद्वारच्या मनसादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६ जणांचा मृत्यू झाला. उच्च दाबाची विजेची तार दर्शनासाठी जमलेल्या भाविकांच्या गर्दीवर कोसळून ही दुर्घटना झाली. उत्तराखंड पोलीस, राज्य राखीव पोलीस दल, आणि इतर यंत्रणांची पथकं बचावकार्य करीत आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी नेलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं आहे.

**//<><><><>//**